


# संशोधन व विकासाची गरज



वैद्य योगेश बेंडाळे

**आयुर्वेदाची आखणी सद्यःकाळातील समजानुसार नसल्यामुळे बरेचदा आयुर्वेद समजण्यात गोंधळ अथवा गैरसमज होऊ शकतात. कोणतेही शास्त्र प्रवाही असले तरच ते जिवंत राहते. आयुर्वेदही यास अपवाद नाही. गरज आहे ती विविध वैद्यकीय तसेच इतर शास्त्रीय शाखांतल्या विद्वानांनी एकत्र येऊन भारतात जन्मलेल्या आणि विकसित झालेल्या या शास्त्राचा आधुनिक काळास अनुसरून संशोधन व विकास करण्याची. असे झाल्यास आपण संपूर्ण जगामध्ये पुन्हा एकदा आपला विज्ञानाधिष्ठित ठसा उमटवू शकतो.**

आयुर्वेद, योग ही भारतीय शास्त्रे गेल्या काही दशकांतील वेगाने लोकप्रियता मिळविणारी शास्त्रे होत. देशातच नव्हे तर परदेशातदेखील या शास्त्रांचा स्वीकार आणि त्याबद्दल उत्सुकता वाढताना दिसत आहे. पण मग, ही शास्त्रे जर काही हजार वर्षांपासून अस्तित्वात आहेत, तर त्यांची व्यावहारिक उपयुक्तता सिद्ध होण्यास अडचण ती काय असावी? 'प्राचीन' हे विशेषण लावलेली ही शास्त्रे जुनी, निरुपयोगी आहेत का? सद्यःकाळात या प्राचीन ज्ञानाचा खरंच उपयोग आहे का? अशा अनेक प्रश्नांचे काहूर उठते.

आधुनिक विज्ञानाने केवळ वैद्यकच नव्हे तर इतर अनेक क्षेत्रांत नेत्रदीपक प्रगती केलेली आढळते. मात्र विज्ञानाचा ऊहापोह होत असताना भारतीय शास्त्रांचा विसर पडायला नको. भारतीय तत्त्वज्ञानानुसार ज्ञान म्हणजे आध्यात्मिक ज्ञान. आणि विज्ञान हे प्रायः भौतिक बाबींशी निगडित आहे. आत्मोन्नतीखेरीज केवळ भौतिक ज्ञानाचा विकास केल्यास बेलगाम घोड्यासारखी परिस्थिती होईल, हे भारतीय शास्त्रज्ञांनी जाणले आणि यातून आयुष्यातील तसेच निसर्गातील संतुलन राखण्याकरिता आयुर्वेदादि शास्त्रांची निर्मिती केली. दुसऱ्या बाजूला आधुनिक विज्ञानातील बहुसंख्य शोध अपघाताने लागल्याचे विदीत आहेच. यालाच इंग्रजीत 'सेरन्डिपिटी' म्हटले जाते. झाडावरून पडणारे फळ पाहून न्यूटनने त्यामागील तत्त्वाचा ध्यास घेतला. त्यापूर्वीही फळे पडतच होती. न्यूटनने त्यामागील तत्त्व शोधून काढले, त्यातून शास्त्र विकसित केले ही त्याच्या स्वतःच्या निरीक्षणशक्तीची कमाल होती. त्यानंतर त्याने स्वतः आणि हजारो इतर तज्ज्ञांनी त्या शास्त्राचे

व्यावहारिक उपयोग केले. दैनंदिन घडणाऱ्या नैसर्गिक घटनांच्या निरीक्षणाअंती अनेक तत्त्वे उलगडली गेल्याची अनेक उदाहरणे आढळतात. आर्किमेडिजचा सिद्धांत, पेनिसिलिनचा शोध हे त्यापैकीच!

अनेक भारतीय शास्त्रांप्रमाणेच आयुर्वेदासही एक सैद्धांतिक बैठक लाभली आहे. सद्यःकाळात हे सहज समजण्याकरिता याची विभागणी आपण तीन प्रकारात करूया. तत्त्व, शास्त्र आणि व्यवहार. आयुर्वेद शाश्वत असल्याचे उल्लेख आयुर्वेदात आहेत. आयुर्वेद हा सृष्टीप्रमाणेच शाश्वत होय. तत्त्व, शास्त्र आणि व्यवहार या त्रिसूत्रींनिशी आयुर्वेद समजून घेण्याचा प्रयत्न करताना त्यातील सामर्थ्य समजण्यास सुरुवात होते.

आयुर्वेदातील तत्त्वे शाश्वत होत. विविध कालखंडांतील शास्त्रज्ञांनी या तत्त्वांचा वापर करून त्या त्या काळाला अनुसरून त्याचे व्यावहारिक उपयोग सांगितले आहेत. सद्यःकाळात यातील काही कालबाह्य अथवा निरुपयोगी वाटू शकतात. मात्र त्यामुळे त्यांच्या शास्त्रीय अथवा तात्त्विक बैठकीस धक्का पोहोचू शकत नाही. आधुनिक वैद्यकाने लावलेले कित्येक शोध कालबाह्य अथवा चुकीचे असल्याचे काही दशकांमध्येच



त्याच शास्त्रातील तज्ज्ञांनी सिद्ध केल्याचीही उदाहरणे आहेतच, यावरून आधुनिक शास्त्राचा फोलपणा सिद्ध होत नाही! शास्त्र असेच प्रवाही असायला हवे. मात्र हजारो वर्षांपासून आयुर्वेद सांगत असलेले एकही तत्त्व चुकीचे असल्याचे सिद्ध होऊ शकलेले नाही. किंबहुना गेल्या काही वर्षांतील शारीरक्रियेविषयीच्या संशोधनांसाठी दिलेल्या काही नोबेल पारितोषिकांची तात्त्विक बैठक आयुर्वेदातच असल्याचे संदर्भांसह सांगता येते. अगदी बारकाईने विचार केल्यास सर्केडियन रिदम असो वा ऑटोफॅगीसाठीच्या नोबेल पुरस्कारांत या तत्त्वांच्या व्यावहारिक उपयुक्ततेविषयी प्रकाश टाकण्यात आला, त्यांची शास्त्रीय बैठक सांगण्यात आली. निसर्गाचा आपल्या शरीरावर किती बारकाईने परिणाम होतो हे आयुर्वेदात दिनचर्या, ऋतूचर्या आदि अध्यायात अत्यंत विस्ताराने सांगितलेली आढळतात. 'लंघन' (काहीही न खाणे/ अत्यल्प/ नियोजनबद्ध खाणे) या चिकित्सा तत्त्वाद्वारे अनेक आजारांची व्याप्ती विशद केल्याचे आढळते. येथे नोबेल पारितोषिकांबद्दल नकारात्मकता किंवा आमच्याकडे सर्व पूर्वीपासूनच शोधून ठेवले असल्याच्या अतिरेकी विचारधारेचा अट्टाहास नाही. केवळ पाश्चात्यांनी सांगितले म्हणून तेच बरोबर आणि नवीन असेच नेहमी असते असे नाही, तर मुद्दा आपल्या शास्त्रांत काय सांगितले आहे त्याची शास्त्रीय माहिती घेण्याचा आहे.


आयुर्वेदाचे आकलन किंवा आपली त्याबद्दलची जाण ही स्वाभाविकच आपल्या विद्यमान शास्त्रांचे ज्ञान आणि माहितीच्या आधारे करतो. आयुर्वेद या शास्त्राचे उपबृंहण दर्शनशास्त्रांच्याद्वारे झाले आहे. आयुर्वेद समजण्यासाठी विविध दर्शनशास्त्रांतील तत्त्वे समजणे अत्यावश्यक होय. अन्यथा ते भौतिकशास्त्रातील तज्ज्ञाने जीवशास्त्रावर भाष्य करणे, त्यातील अशास्त्रीयता सांगण्यासारखे आहे. म्हणूनच आयुर्वेदास 'सर्वदर्शनसंग्रह' म्हटले आहे. फार तर आयुर्वेदातील काही अंशी शास्त्रीय तसेच बहुतांशी व्यावसायिक उपयोग समजण्यास विद्यमान काळातील शास्त्रांचा वापर नक्कीच होऊ शकतो. येथे आयुर्वेदोक्त तत्त्वे भिन्न आहेत हे नमूद करावेसे वाटते.

कोणतेही शास्त्र सिद्ध होण्यास प्रमेय व प्रमाणांची आवश्यकता असते. आयुर्वेदातील प्रत्येक तत्त्व हे यातून तावूनसुलाखून निघाले आहे. प्रमाणांचे प्रायः तीन प्रकार आढळतात, ज्यांचा आजही तंतोतंत वापर केला जातो. पहिले, प्रत्यक्ष प्रमाण कोणत्याही बाबीची प्रत्यक्ष पडताळणी. दुसरे अनुमान प्रमाण, अनुमानाने पडताळणी करणे तर तिसरे म्हणजे आप्त प्रमाण- विषयतज्ज्ञांची मते स्वीकारणे. नोबेल पारितोषिक मिळविलेल्या सिद्धांतांवर विश्वास ठेवून जगातील इतर शास्त्रज्ञ पुढे काम करतात, हा विश्वास म्हणजे 'आप्त'. 'आप्त' ही खरोखरच शाश्वत कल्पना आहे. असो.

आता आयुर्वेद जर इतका तात्त्विक, सैद्धांतिक बैठकीवर आधारित आहे तर विद्यमान काळानुसार त्याचा विकास का झाला नाही? याची अनेक ऐतिहासिक कारणे आहेत. त्याचा ऊहापोह येथे करण्यापेक्षा आयुर्वेदाच्या विकसित शाखांचा केवळ निदर्शक म्हणून उल्लेख करूया.

**आयुर्वेद अष्टांग स्वरूपाचा होय. ही अंगे म्हणजे –**

- **कायचिकित्सा** : ज्याला सध्याच्या भाषेत इंटर्नल मेडिसिन म्हटले जाते. *चरकसंहिता* हा या शाखेचा जगातील पहिला लिखित स्वरूपाचा ग्रंथ होय. यात सुमारे दोन हजार औषधांचा उल्लेख आढळतो आणि यातील श्लोकसंख्या सुमारे १० हजार इतकी आहे. यावरून याचे विस्तृत स्वरूप लक्षात येते. चरकांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी भविष्यात येणाऱ्या आरोग्यविषयक अनेक आव्हानांचा –अनुक्त व्याधींचा –सामना कसा करावा याविषयी तात्त्विक मार्गदर्शन केलेले आढळते. याच आधारावर भारतातील वैद्य आजही आधुनिक व्याधींवर यशस्वी चिकित्सा करताना आढळतात. विशेषतः या शाखेत शारीर व मानसिक आरोग्याचा विचार दिसतो.
- **बालचिकित्सा** : मुलांच्या व्याधींवरील निदान व चिकित्सा –पीडियाट्रिक्स. यामध्ये मूल जन्माला येण्यापूर्वीपासून ते गर्भिणीचे



आरोग्य, सूतिकेचे आरोग्य, गर्भाचे, गर्भिणीचे आणि सूतिकेचे विविध आजार व त्यांची चिकित्सा सांगितली आहे. विलक्षण वाटण्याजोगी बाब म्हणजे, दर महिन्याला गर्भाची वाढ कशी होते याचे (कोणत्याही आधुनिक यंत्राशिवाय) अचूक वर्णन यात आढळते. याकरिता अनेक ग्रंथ उपलब्ध असून, *काश्यपसंहिता* हा बालरोगावरील श्रेष्ठ ग्रंथ समजला जातो.

- **ग्रहचिकित्सा :** या शाखेमध्ये भूतविद्या अथवा अज्ञात कारणांमुळे (ज्याला सद्यःकाळात इडिओपॅथिक असे म्हटले जाते) निर्माण झालेल्या मानसिक समस्या व त्या निवारण्याचे उपाय सांगितले आहेत. उपचारांना यात अध्यात्माची जोड देण्यात आली आहे. या शाखेबद्दल तज्ज्ञांमध्ये मतमतांतरे असू शकतात. अशा स्वरूपाच्या व्याधीने पछाडलेले रुग्ण केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगात प्रत्यक्ष आढळताना दिसतात. मात्र या विषयातील ग्रंथसंपदा विस्कळित असल्याने याबद्दलचे संशय बळावणे स्वाभाविक आहे.
- **उर्ध्वांग शाखा :** शिरोरोग, कान, नाक, घसा व नेत्र शाखा. शालाक्यतंत्र नावाने ओळखली जाणारी ही शाखा. शलाका म्हणजे सळई. सळईच्या साहाय्याने ज्यात प्रामुख्याने शल्य तंत्रात्मक उपचार केले जातात ते शालाक्य तंत्र. कान, नाक, घसा, जीभ, दात, डोळे तसेच शिरोभागातील असंख्य आजारांची कारणे, लक्षणे, औषधी उपाय तसेच शस्त्रकर्म यांचा विस्तृत उल्लेख यात आढळतो. मोतीबिंदूचा जगातील सर्वप्रथम उल्लेख *सुश्रुत संहितेत* आढळतो. एवढेच नव्हे, तर किमान तीन हजार वर्षांपूर्वीचे मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेचे वर्णनदेखील आढळते. एकोणिसावे शतक हा आधुनिक दंतवैद्यकाचा काळ समजला जातो, पण दातांचे आरोग्य, विविध आजार आणि त्यांची चिकित्सा चरक, सुश्रुत, वाग्भट आदींच्या ग्रंथांत विस्ताराने आढळते. याखेरीज निमि ऋषींनी लिहिलेल्या नेत्ररोगावरील विस्तृत ग्रंथातील वर्णनेही विचार करायला लावणारी आहेत.
- **शल्यतंत्र (सर्जरी) :** आधुनिक शल्यतंत्राच्या कोणत्याही पुस्तकास सुश्रुतांच्या उल्लेखाशिवाय पूर्णत्व येत नाही. सुश्रुतामध्ये साडेआठ हजार श्लोक असून अनेक शस्त्रकर्माचा विस्तृत ऊहापोह आढळतो. सध्याच्या काळात अत्याधुनिक समजली जाणारी प्लास्टिक सर्जरी कशी करावी याचे बारकाईने केलेले शास्त्रीय विवेचन सुश्रुतात आढळते. (क्ष-किरण, सिटी स्कॅन, मरि यासारख्या भौतिकशास्त्रातील तंत्रांचा शोध लागलेला नसताना) सुश्रुतामध्ये मोडलेल्या हाडांचे निदान व चिकित्सेचीही तत्त्वे व उपाय सांगितलेले आढळतात.
- **दंष्ट्रा चिकित्सा (टॉक्सिकॉलॉजी) :** विषविज्ञान ही शाखा आयुर्वेदातील अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी शाखा. याचा संबंध केवळ विषारी द्रव्ये, त्यांचे शरीरावरील परिणाम व त्यांची चिकित्सा यापुरते मर्यादित नसून न्यायवैद्यकाशीदेखील आहे. त्याकाळी संशोधनदृष्टी किती विकसित होती याचेच हे निदर्शक होय. या शाखेत विस्ताराने वनस्पतीज, खनिज, प्राणीज विषांचा समावेश होतो.
- **जरा चिकित्सा :** मृत्यूवर नियंत्रण हे जणू मानवाने चिरकाल स्वीकारलेले आव्हानच होय. चिरतारुण्यासाठी सध्याच्या काळात वैद्यकीय शाखांतील तज्ज्ञांनी जणू बाह्याच सरसावल्या आहेत. ओझोन थेरपीपासून अवकाशात राहण्याने मृत्यूवर नियंत्रण मिळविण्याच्या उपायांची चर्चा सुरू आहे. या विषयाचे महत्त्व

ओळखून हजारो वर्षांपूर्वी जरा (वृद्धत्व) येऊ नये किंवा तारुण्य टिकावे याकरिता आयुर्वेदात अत्यंत बारकाईने तात्त्विक ऊहापोह केलेला आढळतो. शरीर या शब्दाची मुळात व्युत्पत्तीच 'जे झिजते ते' अशी आहे. ही झीज दैनंदिन स्वरूपात होत असते. ती कमी करण्याकरिता कोणताही एक जादुई उपाय नसून, दैनंदिन स्वरूपात करण्याजोगे छोटे छोटे पण शाश्वत उपाय आयुर्वेदात सांगितले आहेत. याचमुळे आयुर्वेदाची सर्वांत प्रबळ अशी 'रसायन' ही शाखा विकसित झाली.

✦ **वृष चिकित्सा :** वाजीकरण नावाने विकसित झालेल्या या शाखेत उत्तम प्रजानिर्मितीची मूल्ये, मार्ग व उपाय सांगितले आहेत. मैथुनाचे नियम, नपुंसकता प्रकार वर्णन करून लैंगिक क्षमता कमी झाल्याची कारणे, लक्षणे व उपाय सांगितलेले आढळतात. स्त्री-पुरुषांच्या सुखी वैवाहिक जीवनातील आव्हानांवरदेखील उपाय आढळतात. आजही समाजात लैंगिक बाबींवर उघडपणे चर्चा होत नाही, मात्र आयुर्वेदाची घडण होत असतानाच्या काळातील समाज किती प्रगल्भ, विवेकी तसेच वैयक्तिक व सामाजिक संतुलनाचा विचार करणारा होता हे यावरून लक्षात येते.

या प्रधान शाखांखेरीज आयुर्वेद हा अनेक उपशाखांनी बहरलेला वृक्ष आहे. यात द्रव्यगुण रसशास्त्र, स्वस्थवृत्त आदींचा समावेश होतो. द्रव्यगुण रसशास्त्र तर आयुर्वेदाने संपूर्ण जगाला दिलेली देणगीच म्हणावी लागेल. आधुनिक शास्त्रात वापरात असलेल्या अनेक औषधींची बीजे आयुर्वेदात आढळतात. किंबहुना आयुर्वेदीय वनस्पतींतूनच विशेष कार्यकारी घटक विलग करून आधुनिक औषधे तयार केली जात असल्याची अनेक उदाहरणे आहेत. विसाव्या शतकात उदयास आलेल्या नॅनो टेक्नॉलॉजीची अचंबित करणारी बीजे, तत्त्वे रसशास्त्र या शाखेत आढळतात. आयुर्वेदाच्या शाखा, उपशाखा यांचा विस्तार खरेतर खूप मोठा आहे. जगातील अनेक शास्त्रज्ञांनी यातील छोट्या छोट्या तत्त्वांचा वापर करून पुढे शास्त्र विकसित केले आणि व्यवहारात त्याचा वापर सुरू झाला. याचे एक छोटे उदाहरण म्हणजे आयुर्वेदात गंध-सुगंध आणि त्याच्या उपयोगांचे वर्णन आढळते. पण अरोमा थेरपीची (सौगंधिक चिकित्सा) बीजे आयुर्वेदात आहेत, याची आपल्याला जाणीवही नसते.

हे सारे सांगण्याचा उद्देश, आयुर्वेदातच सर्वकाही आहे असा समज करून देणे हा नाही. यात तात्त्विक बैठकीच्या अनुषंगाने भर घालण्याची गरज निश्चितच आहे, तरच या शास्त्रांचा विकास होऊन त्यांची व्यावहारिक उपयुक्तता समाजापुढे येईल. आयुर्वेद हे भारतातच जन्म आणि विकसित झालेले शास्त्र असले तरीदेखील गेल्या दिडशे वर्षांत वैद्यकांत झालेल्या बदलांमुळे (जे खरोखरच गौरवास्पद आहेत) आयुर्वेदाचा आपल्याला नव्याने परिचय होऊ पाहतो आहे, त्याकडे डोळसपणे पण विशालदृष्टीने पाहणे जसे गरजेचे आहे, तसेच काही नवीन शिकण्याकरिता जुने काही पुसण्याची (अनलर्निंग) गरज असते, हेही तितकेच महत्त्वाचे!

प्रत्येक शास्त्राची मग ते प्राचीन असो वा आधुनिक स्वतःची अशी सैद्धांतिक बैठक असावी लागते. आधुनिक काळात प्रत्येक गोष्ट नावीन्याने सिद्ध झाल्याशिवाय न स्वीकारण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा निदान यासंबंधी आयुर्वेदात शास्त्र म्हणून काय ऊहापोह झाला आहे, ते मूळ ग्रंथातून समजावून घेणे फायदेशीर ठरू शकेल. ज्याकाळात इतर वैद्यकशास्त्रांचा जन्मदेखील झाला नव्हता अशा काळात आयुर्वेदाने मानवी आरोग्य, आजार, प्रतिबंध आणि चिकित्सा किती विस्ताराने सांगितली आहे, याकडे विशालदृष्टीने पाहिल्यास आपण या भारतीय शास्त्राने स्वतःस व जगासदेखील उपयुक्त दिशा देऊ शकू.

आयुर्वेदाची आखणी सद्यःकाळातील समजानुसार नसल्यामुळे बरेचदा आयुर्वेद समजण्यात गोंधळ अथवा गैरसमज होऊ शकतात. कोणतेही शास्त्र प्रवाही असले तरच ते जिवंत राहते. आयुर्वेदही यास अपवाद नाही. *चरकसंहिता* असताना शस्त्र कर्मावर आधारित *सुश्रुत संहितेची* निर्मिती; पुढे *वाग्भट, काश्यप, हारित संहितांची* निर्मिती तर नंतर काही हजार वर्षांनी आधुनिक काळास लाजवेल अशा अथवा अनाकलनीय अशा खनिज अथवा धातूंचा वापर करून त्यावर आधारित विविध ग्रंथनिर्मिती करणे म्हणजे आयुर्वेद सुपरस्पेशलाइज्ड असण्याचेच द्योतक होय.

गरज आहे ती विविध वैद्यकीय तसेच इतर शास्त्रीय शाखांतल्या विद्वानांनी एकत्र येऊन भारतात जन्मलेल्या आणि विकसित झालेल्या या शास्त्रातील तत्त्वांचा आधुनिक काळास अनुसरून संशोधन व विकास करण्याची. असे झाल्यास आपण संपूर्ण जगामध्ये पुन्हा एकदा आपला विज्ञानाधिष्ठित ठसा उमटवू शकतो.



आयुर्वेदीय तत्त्वे आपल्याला सहजासहजी उपलब्ध असली तरी आरोग्य सहज आणि फुकटात उपलब्ध नाही. ते मिळविण्याकरिता रोज काहीना काही कष्ट घ्यावे लागतातच. यालाच जीवनशैली व्यवस्थापन म्हणतात. हे जीवनशैली व्यवस्थापन प्रत्येक व्यक्तिनुसार वेगवेगळे असूच शकते. वैद्यकांत सर्वांना एकच न्याय असे काहीच नसते आणि यातच आयुर्वेदाचे सुपरस्पेशलायझेशन दडले आहे!

**(वैद्य योगेश बेंडाळे संशोधक, लेखक तसेच चिरकारी आणि गंभीर आजारांवरील आंतरराष्ट्रीय किर्तिचे वैद्य आहेत.)** सा